**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या २३ नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी शांततेत मतदान, सर्व ठिकाणी उद्या मतमोजणी

- मुंबई महानगरपालिकेत काँग्रेस स्वबळावर लढणार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष अजित पवारांसोबत जाणार की नाही याचा निर्णय सोमवारपर्यंत

- व्हॉट्सॲप इतर उपकरणांशी जोडण्याच्या प्रक्रियेतल्या कमजोर दुव्यामुळे सायबर हल्ले होण्याची शक्यता सीईआरटीकडून व्यक्त

आणि

- आगामी आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी भारताचं नेतृत्व सूर्यकुमार यादव याच्याकडे, शुभमन गिल संघाबाहेर

**<><><><><>**

राज्यातल्या २३ नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या अध्यक्ष आणि सदस्यपदांसाठी, तसंच विविध नगरपंचायतींमधल्या १४३ सदस्य पदांसाठी आज शांततेत मतदान झालं. निवडणूक आयोगानं दिलेल्या आकडेवारीनुसार दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ४७ टक्क्यांपेक्षा जास्त मतदानाची नोंद झाली.

**अहिल्यानगर**मध्ये दुपारी साडेतीनपर्यंत ५० पूर्णांक २५ शतांश टक्के मतदान झालं.

**हिंगोली** जिल्ह्यातल्या वसमत नगरपरिषदेसाठी ५६ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

**बुलडाणा** जिल्ह्यात, देऊळगाव राजा ३६ पूर्णांक २३ शतांश, जळगाव जामोद जवळपास ४६ टक्के, खामगाव सुमारे ४० टक्के, तर शेगाव इथं जवळपास ५० टक्के मतदान झालं.

**लातूर** जिल्ह्यातल्या निलंगा नगरपरिषदेसाठी दुपारी साडेतीन वाजेपर्यंत साडे ५२ टक्के, तर रेणापूर नगरपंचायतीसाठी ६३ टक्क्यापेक्षा जास्त मतदानाची नोंद झाली आहे.

**वाशिम** जिल्ह्यात ४३ पूर्णांक ३५ शतांश टक्के मतदान झालं.

**सांगलीत** शिराळा नगरपंचायतीसाठी दुपारी साडेतीनपर्यंत जवळपास ७० टक्के मतदान झालं.

**अकोला** जिल्ह्यात बाळापूर नगरपरिषदेसाठी मतदान सुरू झालं.

**यवतमाळ** जिल्हा परिषदेसाठी मतदान सुरू पार पडलं. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या नगराध्यक्षपदासाठी ९ उमेदवार रिंगणात आहेत.

**जालना** जिल्ह्यातल्या तीन नगरपरिषदांसाठी आज मतदान झालं.

**नांदेड** जिल्ह्यातल्या धर्माबाद इथं मतदान सुरू असताना पैशाचं वाटप होत असल्याच्या आरोपावरून गोंधळ झाला. लग्नाच्या हॉलमध्ये कथितरीत्या काही मतदारांना अडवून ठेवल्याचं वृत्त खासगी वाहिन्यांनी दिलं होतं. मात्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी याचं खंडन केलं आहे. पोलिस आणि निवडणूक पथकानं भेट दिली असता इथं कोणीही आढळलं नाही, असं निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितलं.

या सर्व जागा, तसंच २ डिसेंबर रोजी मतदान झालेल्या २६३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींची मतमोजणी उद्या होणार आहे.

**<><><><><>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेची आगामी निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी आज मुंबईत या निवडणुकीसंदर्भात राजकीय व्यवहारविषयक समितीची बैठक घेतली. त्यानंतर वार्ताहर परिषदेत त्यांनी ही घोषणा केली.

- ***- होल्ड... बाईट- रमेश चेन्नीथला - -***

सर्व २२७ जागांवर लढायची काँग्रेसची तयारी असल्याचं ते म्हणाले. मुंबई हे मोठं शहर असून देशाच्या विविध भागांमधून आलेले लोक इथं राहतात. त्यांच्यात एकता राखण्यासाठी आणि त्यांच्या हितासाठी काँग्रेसनं हा निर्णय घेतल्याचं त्यांनी सांगितलं. या निवडणुकीतही धर्मा-धर्मामध्ये फूट पाडायचा प्रयत्न होत असून हे राजकारण संपायला हवं, असं मत त्यांनी मांडलं.

**<><><><><>**

आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये अजित पवार यांच्या पक्षासोबत आघाडी करायची किंवा नाही याचा अंतिम निर्णय सोमवारपर्यंत घेऊ अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस

शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे. मुंबईत त्या वार्ताहरांशी बोलत होत्या.

- ***- होल्ड... बाईट- सुप्रिया सुळे - -***

- <><><><><>

ठाकरे बंधू एकत्र आले तरी भाजपाला काहीही फरक पडत नसल्याचा दावा भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केला. अकोल्यात ते वार्ताहरांशी बोलत होते. एकनाथ शिंदे आणि भाजपमध्ये चर्चा सुरू आहेत. अजित पवार यांनीही चर्चेची तयारी दाखवली, तर भाजपा त्यासाठी तयार आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं. नवाब मलिकांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसनं निवडणूक लढवली तरी भाजपाला काहीही फरक पडत नाही, असं ते म्हणाले. नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांमध्ये भाजपा आणि महायुतीला मोठं यश मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

- ***- होल्ड... बाईट- बावनकुळे*** - -

- <><><><><>

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपा नेते आशिष शेलार यांनी मीरा रोडमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीत मुंबई महानगर क्षेत्रातल्या महापालिका निवडणुकांमध्ये महायुती संदर्भात सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती शेलार यांनी दिली.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण ग्रामीणचे माजी आमदार सुभाष भोईर यांनी समर्थकांसह शनिवारी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. पिंपरी - चिंचवडचे माजी महापौर संजोग वाघेरे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष प्रशांत शितोळे यांच्यासह पुण्यातल्या काही नगरसेवकांनी आणि कार्यकर्त्यांनीही आज मुंबईत भाजपात प्रवेश केला. याशिवाय ठाण्यातल्या काही पदाधिकाऱ्यांनीही आज भाजपामध्ये प्रवेश केला.

<><><><><>

भारतीय जनता पक्ष सत्तेत राहण्यासाठी फोडा आणि राज्य करा ही नीती अवलंबत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी आज पुण्यात केला. भाजपा धर्माचं आणि भाषेचं राजकारण करत आहे, विरोधात बोलणाऱ्यांचा

आवाज दाबत आहे, याच्या विरोधात नागरिकांनी एकत्र यायला हवं, असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

व्हॉट्सअ‍ॅप इतर उपकरणांशी जोडण्याच्या प्रक्रियेतल्या कमजोर दुव्यामुळे व्हॉट्सअ‍ॅप खात्यांवर सायबर हल्ले होण्याची शक्यता असल्याचा इशारा सीईआरटी या भारताच्या सायबर सुरक्षा संस्थेनं दिला आहे. या कमजोर दुव्याला ‘घोस्ट पेअरिंग’ असं नाव देऊन यासंदर्भात संस्थेनं मार्गदर्शक सूचना जारी केल्या. व्हॉट्सअ‍ॅपचं खातं एखाद्या उपकरणाशी जोडताना पडताळणी न करता पेअरिंग कोड्स वापरून सायबर हल्लेखोर व्हॉट्सअ‍ॅप खात्यांचं पूर्ण नियंत्रण मिळवू शकतात, यासाठी पासवर्ड किंवा सिमकार्ड बदलण्याची गरज लागत नाही, अशी भीती यात व्यक्त करण्यात आली आहे. यात वापरकर्त्यांना एखाद्या विश्वासातल्या व्यक्तीकडून फोटो आणि त्यासोबत लिंक असा मेसेज येतो. ती लिंक बनावट फेसबुक वापरकर्त्याच्या प्रोफाइलची असते आणि तो मजकूर पाहण्यासाठी ‘व्हेरिफाय’ करावं असा संदेश येतो. इथं व्हॉट्सअ‍ॅपच्या फोन नंबरद्वारे लिंक करायच्या फीचरचा वापर करून सायबर हल्लेखोर व्हॉट्सअ‍ॅप खातं हॅक करतात आणि वापरकर्त्याचे फोटो, व्हिडिओ, संदेश यासह सर्व गोष्टी ते बघू शकतात. हे टाळण्यासाठी ओळखीच्या व्यक्तीकडून आलेल्या संशयास्पद लिंक्सवरही क्लिक करू नये, किंवा व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुकसारख्या दिसणाऱ्या कोणत्याही बाहेरच्या संकेतस्थळावर आपला फोन नंबर घालू नये, अशी सूचना सीईआरटीनं केली आहे.

<><><><><>

भारताचं परराष्ट्र धोरण पाश्चात्य विचारांच्या पलीकडे जाऊन आपल्या संस्कृतीवर आधारित असायला हवं, असं मत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज मांडलं. पुण्यात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय पुस्तक महोत्सवाच्या एका सत्रात ते बोलत होते. रामायण आणि महाभारत ही केवळ धार्मिक पुस्तकं नसून जागतिक राजकारणाचे धडे देणारे उत्तम मार्गदर्शक आहेत, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

<><><><><>

आगामी आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाचं नेतृत्व सूर्यकुमार यादव याच्याकडे देण्यात आलं असून उपकर्णधारपद अक्षर पटेलकडे असेल. या संघाची

घोषणा आज बीसीसीआयनं केली. इशान किशन आणि रिंकू सिंह यांनी संघात पुनरागमन केलं आहे. सलामीचे फलंदाज संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांची नावं नक्की झाली आहेत. याशिवाय, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंह, हर्षित राणा आणि वरुण चक्रवर्ती यांचा समावेश संघात करण्यात आला आहे. शुभमन गिल याला संघाबाहेर ठेवण्यात आलं आहे. आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धा २ फेब्रुवारी ते ८ मार्च यादरम्यान होणार आहे.

<><><><><>

राज्याच्या माजी महसूलमंत्री शालिनीताई पाटील यांचं आज मुंबईत निधन झालं. त्या ९८ वर्षांच्या होत्या.

<><><><><>

गेल्या २४ तासात विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी तापमान जळगाव इथं ६ अंश सेल्सिअस इतकं नोंदलं गेलं. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी उद्या थंडीची लाट येण्याची शक्यता आहे.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//